# **हरियाणाच्या वीज कामगारांच्या संघर्षाला पाठिंबा द्या!**

कामगार एकता कामिटीचे (KECचे) निवेदन, २२ ऑक्टोबर २०२६

राज्याच्या वीज क्षेत्राचे ज्या कपटी पद्धतीने खाजगीकरण केले जात आहे, त्याच्या निषेधार्थ हरियाणा इलेक्ट्रिसिटी एम्प्लॉईस अँड इंजिनीयर्स जॉईंट फोरम (हरियाणा वीज कर्मचारी आणि अभियंता संयुक्त मंचाने) २२ ते २४ ऑक्टोबर २०२६ या तीन दिवसांच्या संपाची घोषणा केली आहे.

**कामगार एकता कमिटी, हरियाणाच्या वीज कामगारांच्या संपाला मनापासून पाठिंबा देते आणि सर्व राज्यांतील वीज कामगारांना, तसेच इतर कामगार आणि उपभोक्ता यांना एकजुटीने पाठिंबा देण्याचे आवाहन करते!**

हे लक्षात घ्यावे की, स्वतंत्र कृषी वितरण कंपनी (Agri Discom) स्थापन करणे, समांतर वितरण परवाने देणे आणि स्मार्ट मीटर बसवणे यांसारख्या राज्य सरकारच्या पावलांना विरोध करण्यासाठी हरियाणाच्या वीज कामगारांनी यापूर्वी ११ ऑगस्ट २०२६ पासून तीन दिवसांच्या संपाची घोषणा केली होती. संपाच्या केवळ एक दिवस आधी, १० ऑगस्ट रोजी, ऊर्जा मंत्र्यांनी कामगारांना लेखी आश्वासन दिले होते, ज्यामुळे त्यांनी संप मागे घेतला होता.

मात्र, आता राज्य प्रशासनाने दिलेलीआश्वासने मोडली आहेत आणि खाजगीकरणाच्या दिशेने पाऊल पुढे टाकले आहे. १८ ऑक्टोबर रोजी, हरियाणा विद्युत नियामक आयोगाने (HERCने) गुरुग्राम आणि नूह जिल्ह्यांसाठी 'इलेव्हन पॉवर' या खाजगी कंपनीला २५ वर्षांच्या कालावधीसाठी समांतर वीज वितरण परवाना देण्याचा जनविरोधी आणि कामगारविरोधी निर्णय घेतला आहे.

हरियाणातील वीज वितरणाचे अशा प्रकारे खाजगीकरण, हे संपूर्ण देशासाठी एक हानिकारक पायंडा पाडेल. हे खाजगीकरण केवळ मोठ्या भांडवलदारांचा नफा अनेक पटींनी वाढवण्यासाठी केले जात आहे, जे आता राज्याच्या कोट्यवधी रुपयांच्या वितरण पायाभूत सुविधांचा वापर, ग्राहकांना लुटण्यासाठी आणि कामगारांना त्यांचे उपजीविकेच्या आणि नोकरीच्या सुरक्षिततेच्या हक्कांसकट मोठ्या कष्टाने जिंकलेले हक्क नाकारण्यासाठी करतील.

भांडवलदार वर्गाचे खिसे भरण्याच्या प्रयत्नात, सरकारांनी वेळोवेळी वीज क्षेत्रातील फायदेशीर भागांचे खाजगीकरण करण्याचे विविध प्रयत्न केले आहेत– कधी समांतर वितरणाच्या नावाखाली, तर कधी मानित वितरण, फ्रँचायझी, स्मार्ट मीटर इत्यादींच्या माध्यमातून.

वेळोवेळी, देशातील वीज क्षेत्रातील कामगारांनी एकजुटीने आणि दृढनिश्चयाने या हल्ल्यांना विरोध केला आहे. त्यांनी दाखवून दिले आहे की, विविध गट आणि संघटना, तसेच कामगार आणि उपभोक्ता यांच्यातही एकता कशी निर्माण केली जाऊ शकते. वीज कामगार आणि शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण विरोधामुळेच वीज सुधारणा विधेयक एका दशकाहून अधिक काळ मंजूर झालेले नाही.

खाजगीकरणाविरोधातील लढा केवळ कामगारांचा नाही. हरियाणा इलेक्ट्रिसिटी एम्प्लॉईस अँड इंजिनीयर्स जॉईंट फोरम ने सामान्य उपभोक्ता, शेतकरी संघटना आणि स्थानिक नागरिक संस्थांनाही त्यांच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. हरियाणाच्या वीज कामगारांच्या संघर्षाला देशातील सर्व कामगार आणि लोकांचा संपूर्ण पाठिंबा मिळायलाच हवा!

**वीज ही एक मूलभूत गरज आहे आणि म्हणूनच तो सर्वांचा मूलभूत हक्क आहे!**

**सार्वजनिक पैशाने उभारलेल्या मालमत्तांचा वापर खाजगी नफा कमावण्यासाठी होऊ देता कामा नये!**

**कामगार, कष्टकरी, शेतकरी आणि सर्व शोषित लोकांची एकता जिंदाबाद!**

**इन्किलाब जिंदाबाद!**